# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०७/०४/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०१) इतिवृत्त

सोमवार **दिनांक ०७ एप्रिल २००८** रोजी पिठासीन अधिकारी **मा.महापौर सौ. विजया किशोर रहाटकर** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची विशेष स्थायी समिती सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११-३० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला नगरसचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

01.स.स. श्री. संजय रामदास जोशी
02 स.स. श्री. अ. साजेद अ. सत्तार
03 स.स. श्री. अ. रशीद खान
04. स. स. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
05. स. स. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
06. स्.स. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
07. स. स. श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
08. स.स. श्री. दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर
09. स.स्. श्री. कचरू श्रीपत सोनवणे
10. स. स. श्री. खान जावेद हसन खान
11. स. स. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
12. स. स. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
13. स. स. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
14. स. स. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
15. स. स. श्री. सिताराम इसराम सुरे

**विषय क्र. 01 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१)आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती याची निवडणूक घेणे ) नियम २००७ अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

नगर सचिव :सभापती, स्थायी समिती निवडी संबधी ठळक कार्यपध्दती मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे ण्सभापती यांची निवडणूक घेणे )नियम २००७ चे नियम २ (२ )चे तरतूदीप्रमाणे मा. महापौर यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी स्थायी समिती विशेष सभेची दिनांक ०७-०४-२००८ ही निश्चित करण्यात आली आहे.

०१. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी बोलावण्यात आलेली विशेष बैठक नियम क्र. २(३ )च्या तरतूदी प्रमाणे रद्य किंवा तहकुब करता येणार नाही.

०२. नियम ४ (१) अन्वये विशेष स्थायी समिती सभेच्या अध्यक्षस्थानी (पिठासीन अधिकारी )मा. महापौर किंवा त्यांच्या अनुपस्थितीत मा. उपमहापौर असेल, आता मा. महापौर अध्यक्षपद स्विकारले आहे.आणि नियम ४ (२) प्रमाणे जर महापौर किंवा उपमहापौर कोणत्याही कारणास्तव बैठकीचे अध्यक्षस्थान भुविण्यास असमर्थ असतील तर निर्वाचित पालिका सदस्यापैकी (स्थायी समिती सदस्यापैकी ) ज्येष्ठतम सदस्य बैठकीचे अध्यक्षस्थान भुषविल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१ ) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती,

प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे ) नियम २००७ अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ३१-०३-२००८ रोजी निवडणूक घेणे संदर्भात परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे त्यानुसार दिनांक ०५-०४-२००८ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ०५-०४-२००८ रोजी कार्यालयीन वेळेस स्थायी समिती सभापती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

०१. श्री. संजय रामदास जोशी

०२. श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

(नगरसचिव हे स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त झलेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थयी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम २००७ चे नियम क्र. ५ (२) अन्वये सभापती स्थायी समिती पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येत आहे.

दिनांक ४-४-२००८ रोजी अनु.क्र. १ वर दाखल झलेला फॉर्म आहे श्री. संजय रामदास जोशी त्यांचे सुचक श्री. रविकांत काशिनाथ गवळी आणि अनुमोदक श्री.सतीश विश्वनाथ कटकटे फॉर्म वर सुचक व अनुमोदक दोघाच्याही सहया आहे उमेदवाराचीही सही आहे सहया आपल्याच आहेत का प्रत्यक्ष विचारणा केली असता सुचक व अनुमोदक यांनी` होय असे उत्तर दिले.हा फॉर्म वैध आहे. अनु.क्र. २ वर दि.४-४-२००८ रोजी श्री.संजय रामदास जोशी याचा फॉर्म दाखल झाला हा दुसरा फॉर्म आहे सुचकाचे नाव श्री. सतीश विश्वनाथ कटकटे अनुमोदक श्री. सिताराम इसराम सुरे आहे. सहया आपल्याच आहेत का विचारणा केली असता सुचक व अनुमोदक यांनी होय असे उत्तर दिले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एक उमेदवाराचा एक फॉर्म वैध झाला तरी पुढील कामकाज करता येते.प्रत्येक नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची गरज नाही.

श्री.अ.रशिद खान :दोन्ही उमेदवाराचे एक एक फॉर्म वैध केल्यास कामकाज करता येते.आठ फॉर्म आलेले आहे सर्वांचीच छाननी करणार काय ?

मा.पिठासीन अधिकारी :एकूण आठ फॉर्म असून दोन उमेदवार आहे.:जेव्हढे फॉर्म आलेले आहे त्याची छाननी होणे आवश्यक आहे. श्री.संजय रामदास जोशी यांचा दुसरा फॉर्म पण वैध आहे. अनु. क. ३ वर दिं. ४-४-२००८ रोजी श्री. संजय रामदास जोशी याचा फॉर्म आहे सुचक श्री. कचरू विश्वनाथ मोरे अनुमोदक श्री. कचरू श्रीपत सोनवणे सहया आपल्याच आहेत का अशी विचारणा केली असता सुचक व अनुमोदक यांनी होय असे उत्तर दिले.

श्री.अ.रशीन खान :एक उमेदवाराचे चार फॉर्म आहे तर चारही वैध करणार की एकच वैध करणार एक वैध झाला तर पूरे आहे.

नगर सचिव :आलेल्या पुर्ण नामनिर्देशन पत्राची छाननी करायची आहे.

मा. पिठासीन अधिकारी :आलेल्या सर्व नामनिर्देशनाची छाननी पूर्ण करणे गरजेचे आहे

श्री.संजय जोशी :मला जरी बाहेरच्या व्यक्तीला निरोप दयायचा झाल्यास तो सांगू शकतो का ?

श्री.जावेद हसन खान :या बैठकीमध्ये सांगू शकत नाही.

मा.पिठासीन अधिकारी : अनु.क्र. ३ वर श्री. संजय रामदास जोशी यांचे सुचक श्री. कचरू विश्वनाथ मोरे अनुमोदक श्री. कचरू श्रीपत सोनवणे या दोघांच्याही तसेच उमेदवाराची पण यावर सही आहे. हा फॉर्म वैध ठरविण्यात येतो.अनु.क्र. ४ वर दिनांक ४-४-२००८ रोजी श्री. संजय रामदास जोशी याचा फॉर्म आहे या फॉर्मवर सुचक श्री नारायण तिलोकचंद कुचे अनुमोदक श्रीमती जयश्री सारंग किवळेकर यांचे सहया आहेत सहया आपल्याच आहेत का अशी सुचक व अनुमोदक यांना विचारणा केली असता होय असे उत्तर मिळते. हा फॉर्म वैध आहे.

दिनांक ५-४-२००८ रोजी अनु.क्र.५ वर श्री.अ.साजेद अ. सत्तार यांचा फॉर्म आहे यावर सुचक श्री. अ.रशिद खान अनुमोदक म्हणून श्री. पाटील नरवडे वसंत यांचे सहया आहे सहया आपल्याच आहेत का अशी विचारणा सुचक व अनुमोदक यांना केली असता होय असे उत्तर मिळते हा फॉर्म वैध आहे.दिनांक ५-४-२००८ रोजी अनु.क्र. ६ वर दाखल केलेला श्री.अब्दुल साजेद अ. सत्तार यांचा फॉर्म आहे सुचक श्रीखान जावेद हसन कासीम हसन अनुमोदक श्रीमती मोमीन सफिया फिरदोस सहया आपल्याच आहेत का अशी सुचक व अनुमोदक यांना विचारणा केली असता होय असे उत्तर मिळते हा फॉर्म वैध ठरविण्यात येतो अनु क्र. ७ वर श्री. अब्दुल साजेद अ. सत्तार यांचा फॉर्म असून सुचक श्री.खान जावेद हसन कासीन हसन अनुमोदक श्री पाथ्रीकर दत्ताभाउ अण्णासाहेब सहया आपल्याच आहेत का अशी सुचक व अनुमोदक यांना विचारणा केली असता होय असे उत्तर मिळतेऱ्हा फॉर्म वैध आहे. अनु.क्र. ८ हा फॉर्म दिनांक ५-४-२००८ रोजी दाखल झालेला आहे. फॉर्म श्री. अब्दुल साजेद अ. सत्तार यांचा आहे.सुचक श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ अण्णासाहेब अनुमोदक श्रीमती मोमीन सफिया फिरदोस सहया आपल्याच आहेत का अशी सुचक ण्व अनुमोदक यांना विचारणा केली असता होय असे उत्तर मिळते. हा फॉर्म वैध आहे.

स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

०१. स.स. श्री.संजय रामदास जोशी

०२. स.स. श्री. अ. साजेद अ.सत्तार

मा.पिठासीन अधिकारी :छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून उमेदवारास नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असल्यास त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे )नियम २००७ चे नियम क्र. ५ (३)अन्वये १५ मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे दुपारचे १२-०७ वाजले असून १२-२२ वाजेपर्यत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.५ (४) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्य करता येणार नाही.

या कालावधीतच सुमारे १२-२० या वेळात काही व्यक्तीनी अचानक सभागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारातून जबरदस्तीने प्रवेश केला त्यामूळे सभागृहात एकच गोंधळ झाला त्या लोकांनी सभागृहात तोडफोड सुरू केली याच वेळी सभागृहातील माईक तोडणे, काचा फोडणे, खुर्च्या फेकणे कपबश्या फेकणे इत्यादी प्रकार घडला व सभागृहात गोधळ होत होता हा गोधळ अंदाजे १२-२५ वाजेपर्यत चालू होता.याच सुमारास सभागृहाचे सदस्य आणि पीठासीन अधिकारी यांच्यात जोरजोरात आरोप प्रत्यारोप चालू होते या गोंधळात कोण काय बोलत होते हे समजून येत नव्हते.

मा.पिठासीन अधिकारी :त्वरीत पोलीस संरक्षण मागविण्यात यावे.पोलीस संरक्षण मिळाल्याशिवाय सभा चालविणे उचित होणार नाही

श्री.अ.रशिद खान :पोलीस आपण मागविले पोलीस कर्मचारी येतीलच परंतू आजची सभा तहकूब करू नये.

याच वेळी आजची सभा ही निवडणूकीची सभा असल्यामूळे तहकूब किंवा रद्य करता येत नाही अशी काही सदस्य मोठमोठयाने मागणी करतात

मा.पिठासीन अधिकारी : पोलीस संरक्षण नाही व माझी प्रकृत्ती अस्वस्थ झाल्यामूळे मी सभागृहाच्या बाहेर जात आहे.

सुमारे १२-३० ते १२-३५ वाजता मा.पिठासीन अधिकारी (मा.महापौर) या सभागृहातून निघून जातात.या वेळीही सभागृहात गोंधळ चालूच असतो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : या सभेला जेष्ठ सदस्य श्री. अ.रशिद खान यांचे नाव मी पिठासीन अधिकारी म्हणुन सुचवित आहे.

श्री.वसंत नरवडे :स.स. श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ यांचे सुचनेस माझे अनुमोदन आहे सभेचे कामकाज सुरू करावे.

याच वेळी सुमारे १२-३५ ते १२-४० या दरम्यान ज्येष्ठ स.सदस्य श्री.अ.रशीद खान हे पीठासीन अधिकारी म्हणून आसन ग्रहण करतात.

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशीद खान) :ज्येष्ठ सदस्य म्हणून माझे नाव सदस्यांनी पिठासीन अधिकारी म्हणून सुचविले आहे तेंव्हा आता सभेचे कामकाज सुरू झाले आहे.सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.संजय जोशी :मा.महापौर उपस्थित नसल्यास पिठासीन अधिकारी म्हणून डायरेक्ट ज्येष्ठ सदस्यांस बसता येत नाही.मा.उपमहापौर यांना बसण्याचा अधिकार असतो नियमाने कामकाज व्हावे प्रशासन अडचणीत येईल.

स. सदस्य श्री.संजय जोशी व इतर सदस्य पिठासीन अधिकारी च्या संदर्भात सभागृहात मोठमोठयाने चर्चा करीत होते. याच दरम्यान बाहेरील काही व्यक्ती अचानक सभागृहात येवून मोठमोठयाने बोलतात व घोषणा देतात. काहीही ऐकू येत नाही.याच दरम्यान सुमारे १२-४० ते १२-४५ या वेळात पोलीस अधिकारी व कर्मचारी हे सभागृहात दाखल होतात.आणि .१.१० ते १.१५ वाजेच्या दरम्यान मा.महापालिका आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.परीस्थितीवर नियंत्रंण ठेवण्यासाठी स.सदस्य, कर्मचारी, अधिकारी व पत्रकार यांना सोडून इतरांना सभागृहाबाहेर काढण्यात आले ही कार्यवाही सुमारे १-२० वाजेपर्यत चालू होती.

मा.आयुक्त : पिठासीन अधिकारी बाबत असलेली नियमातील तरतूद अशी आहे की नियम ४ (१) अन्वये बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी महापौर किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपमहापौर असेल असे दिले व नियम क्र. ४ (२) मध्ये जर महापौर किंवा उपमहापौर हे कोणत्याही कारणास्तव त्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषवू शकण्यास असमर्थ असतील तेव्हा पुर्वगामी उपकलमाच्या तरतुदीप्रमाणे महानगरपालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यापैकी ज्येष्ठतम सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील असे दिले आहे या तरतुदीनुसार पूढील कार्यवाही करता येते.

निवडणूक प्रक्रियेला मा. पिठासीन अधिकारी (मा.महापौर)यांनी सुरूवात केली दाखल झ ाालेले नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे जाहिर केले.त्यानंतर १५ मिनिटाचा अवधी म्हणजे दुपारी १२.०७ ते १२-२२ पर्यत नामनिर्देशन पत्र परत घेण्याची वेळ दिली होती. १२-३० वाजता मा.पिठासीन अधिकारी म्हणून बसलेले मा. महापौर सभगृहातून निघून गेल्या. त्यानंतर मा. उपमहापौर यांची वाट बघीतली उपमहापौर आले नाही. त्यानंतर पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित सभागृहातील सदस्यांनी नाव सुचविल्या नुसार ज्येष्ठ सदस्यांना बसण्याचा अधिकार आहे माझे नाव सुचविले आता नियमानुसार मी पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहत आहे.असे स. स. श्री.अ. रशीद खान यांनी मा. महापालिका आयुक्त यांना सांगितले.

श्री.अ.रशीद खान तसेच स.सदस्य यांचेत पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहण्याच्या संदर्भात वादविवाद सुरू झाला .मोठमोठयाने बोलणे चालू होते काहीही ऐकू येत नव्हते.अंदाजे वेळ १-१५ ते १-२० वाजेपर्यत

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशीद खान) : आता निवडणूक प्रक्रिया चालू आहे. स. सदस्य श्री. संजय जोशी यांना त्यांचे मत मांडावयाचे आहे त्यांनी मत मांडावे.

श्री.संजय जोशी :निवडणूक प्रक्रिया चालू असतांना मा.महापौरावर दादागिरी केली गेली एक महिला महापौर असतांना दादागिरी करून त्यांना घाबरवले गेले त्यांचे ब्लडप्रेशर वाढविले गेले हा सर्व प्रकार बघता लोकशाहीला धरून नाही. त्यामूळे आज आम्ही या सभागृहातून निवडणूकीवर बहिष्कार टाकून निघून जात आहोत. मा. आयुक्ताच्या नावाने मी एक पत्र दिले आहे की स्थायी समिती सदस्य दवाखान्यात गेलेले असल्यामुळे आपण निवडणुकीचा योग्य तो निर्णय घ्यावा.हे पत्र मी सर्वांसमक्ष मा. आयुक्तांना दिलेले आहे. याची स्थळ प्रत माझेकडे नाही पिठासीन अधिकारी जरी

दुसरे असले तरी नगरसचिव ,व मा. आयुक्त हे सुध्दा या गोष्टीला तेवढेच जबाबदार असतात.त्यामूळे मा.आयुक्तांच्या नावाने एक पत्र दिलेले आहे. मा. आयुक्तांना विनंती की माझेकडे स्थळप्रत नसल्यामूळे आपण मला याचा लेखी खुलासा करावा आपण हे करू शकतो का ?

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशीद खान ) :स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी जे बोलले पिठासीन अधिकारी यांना लिहून दिले नाही.तसेच त्यांनी जे म्हटले की महिला महापौर असल्यामूळे जी घटना घडली ती अत्यंत निदंनीय आहे.ज्यांनी घटना घडवून आणली त्या संबधीतावर पोलीसात गुन्हा दाखल व्हावा व त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी.यामागे कुणाचा हात आहे त्याचा शोध घेवून त्यांचेवर ही गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री.संजय जोशी :आम्ही या सभागृहातून सभात्याग करून जातो.

याच वेळी १-२९ वाजता शिवसेना -भारतीय जनता पक्ष, सदस्य सभागृहातून निघून जातात.

श्री.वसंत नरवडे : बैठकीचे कामकाज चालू असतांना काही स. सदस्य सभात्याग करून निघून गेले असले तरी आठ सदस्य आहे सभा घेण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सभागृहाचे कामकाज सुरू झाले व नामनिर्देशन पत्र छाननीच्या वेळी तसेच उमेदवारी परत घेण्याच्या वेळेपर्यत सभागृहात १५ स.सदस्य उपस्थित होते याची नोंद रजिस्टरला आहे का?

मा.पिठासीन अधिकारी :नामनिर्देशन पत्र परत घेण्याच्या वेळेपर्यत किती सदस्य सभागृहात उपस्थित होते नगरसचिव यांनी उपस्थिती रजिस्टर सादर करावे.

नगरसचिव उपस्थिती रजिस्टर मागवून घेतात व ते पिठासीन अधिकारी यांचेकडे सादर करतात.

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशीद खान ) : निवडणूक प्रक्रियेला सुरूवात होत आहे.

सौ. मोमीन सफिया फिरदोस : आजची सभा तहकूब करता येते का?

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशिद खान ) :जेंव्हा निवडणूक प्रक्रिया सुरू होते सदस्य हजर असतात. त्यानंतर कुणी कोणत्याही कारणास्तव बाहेर गेले किंवा आजारी असेल तरी ही नियमानुसार ही सभा तहकूब किंवा रद्य करता येत नाही.काही स. सदस्य आताच सभात्याग करून सभागृहाच्या बाहेर गेलेले आहे ५ मिनिटात त्यानी सभागृहात हजर व्हावे अशी अपेक्षा करतो त्यानंतर सभेचे कामकाज सुरू होईल. (वेळ सुमारे १-२६वा.)

श्री.अ.साजेद अ.सत्तार :हजेरी रजिस्टर मागविले त्यात किती सदस्य उपस्थित आहेत.

मा.पिठासीन अधिकारी :नामनिर्देशन पत्र परत घेण्याच्या वेळेपर्यत १५ स.सदस्य सभागृहात उपस्थित होते त्यांच्या हजेरी रजिस्टरवर सहया आहे. हात वर करून मतदान करण्याच्या वेळेपर्यत आले तर सही घेतली जाईल

स्थायी समिती सभापती पदासाठी ०२ उमेदवारापैकी विहित मुदतीत एकाही उमेदवाराने आपले उमेदवारी अर्ज परत घेतले नाही.

स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे नियम २००७ चे नियम क्र. ६ (३) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहेत.

०१. स. स. श्री. अ.साजेद अ. सत्तार
०२. स. स. श्री. संजय रामदास जोशी

मा.पिठासीन अधिकारी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थयी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे ) नियम २००७ चे नियम क्र. ६ (३ )प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल.

सभापती स्थायी समिती निवडी संबधी कार्यपध्दती ....

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम २००७ चे तरतुदी अन्वये सभापती पदाच्या मतदान प्रक्रिया व निवडी संबधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

०१. नियम ६(१) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

०२ नियम ६(२)अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे लावतील.

०३ नियम क्र.६ (३) अन्वये उमेदवाराचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल. ज्यांचे नांव पुकारण्यात येईल त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.

०४ नियम क्र. ६ (४)(एक ) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा. पिठासीन अधिकारी देतील.

०५. नियम क्र. ६(४)(दोन )अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

०६ नियम क्र.६(५)अन्वये ज्या पालिका सदस्यांनी मतदान केलेले नाही. त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०७. नियम क्र. ६(८) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की निवडणुकीचा निकाल चिठठया टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठठी काढण्यात येईल.

०८. नियम क्र.६ (९) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

मा.पिठासीन अधिकारी (श्री.अ.रशिद खान) : आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नाव घोषित करण्यात येतील.

श्री. अब्दुल साजेद अ. सत्तार यांना ज्यांना मते द्यावयाचे आहे त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतदान गणना अधिकारी यांनी कृपया ज्यानी ज्यांनी श्री. अ.साजेद अ. सत्तार यांना हात वर करून मतदान करीत आहे त्यांची नावे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. श्री. अ. साजेद अ. सत्तार यांना हात वर करून मतदान केलेल्या स.सदस्यांची नावे -

०१.स.स. श्री. अब्दुल साजेद अ. सत्तार
०२.स.स. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
०३.स.स. श्री.कचरू श्रीपत सोनवणे
०४,स. स. श्री. खान जावेद हसन खान कासीम
०५,स.स. श्री. वसंत नरवडे पाटील
०६,स.स. श्री. मोरे कचरू विश्वनाथ
०७,स.स. श्री. दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर
०८.स.स. श्री. अ.रशीद खॉन (मामू)

मा.पिठासीन अधिकारी :०५ मिनिटात बाहेर गेलेले सदस्य सभागृहात येतात की नाही वाट पाहणार आहोत.

मा.पिठासीन अधिकारी :श्री. संजय रामदास जोशी यांना ज्यांना मते द्यावयाचे आहे त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतदान गणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यानी श्री. संजय रामदास जोशी यांना हात वर करून मतदान करीत आहे त्यांची नावे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझ ोकडे सादर करावी.श्री. संजय रामदास जोशी यांना हात वर करून मतदान केलेल्या स. सदस्यांची नांवे

**निरंक .**

**मतदान न केलेल्या सदस्यांची नांवे**

०१.स.स. श्री संजय रामदास जोशी

०२.स.स. श्री मोहन धन्नुलाल मेघावाले
०३. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
०४. स.स. श्री सतीश विश्वनाथ कटकटे
०५. स.स. श्री रविकांत काशिनाथ गवळी
०६. स.स. श्री.नारायण तिलोकचंद कुचे
०७. स.स. श्री सिताराम इसराम सुरे

| | | |
|---|---|---|
| एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | **१५** |
| मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | **०८** |
| मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | **०७** |

उमेदवारांना मिळालेली मते :

०१ स. सदस्य **श्री. संजय रामदास जोशी** यांना शुन्य (**००**)मते मिळालेली आहे.

०२. स. सदस्य **श्री. अ. साजेद अ. सत्तार** यांना एकूण आठ (**०८**)मते मिळालेली आहे.

वरील प्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी **श्री. अ. साजेद अ. सत्तार** यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत त्यांची स्थायी समिती सभापती पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणूक घेणे ) नियम २००७ अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत असून त्यांचे अभिनंदन करण्यांत येत आहे. त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी सभापती पदाचे आसनगृहन करावे.

नुतन सभापती हे सभापती पदाचे आसन गृहन करतात.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार **श्री. अ. साजेद अ.सत्तार** यांना सर्वात जास्त आठ (०८)मते मिळालेली आहेत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ अन्वये श्री. अ. साजेद अ. सत्तार यांची **०८** विरूध्द **००** या बहुमताने निवड झाली या निवडीस मान्यता देण्यात आली.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद